नि दि म नं २८/२००९
भिमराव वि. गणेश

CNR- MHYA110000702009

## नि.क्र. १३१ वरील आदेश

**(दिनांक ११.०७.२०२४ रोजीचा आदेश )**

०१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी वादी मयत झाल्याने त्यांचे वारस अभिलेखावर घेण्याकामी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम २ व आदेश ६ नियम १७ नुसार वारस अभिलेखावर घेवुन त्याअनुशंगने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकामी दाखल केला आहे. अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला.

०२. अर्जदार यांचे कथनाप्रमाणे दाव्यातील वादी भिमराव मोरे यांचे दिनांक २६/१०/२०२३ रोजी निधन झाले आहे आणि अर्जदार हे त्यांचे वारस असुन त्यांना दाव्यास कारण पुढे चालु राहिल्याने त्यांना अभिलेखावर मयताचे वारस म्हणुन घेण्यास परवानगी देवुन दावा दुरुस्ती करण्यास परवानगी देण्याची विनंती केली. दाव्यातील प्रतिवादी यांनी अर्जास विरोध दर्शवुन पोलिस पाटील यांना वारसप्रमाणपत्र देण्याचा अधिकार नसुन अर्जदार यांनी मयताचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र दाखल केले नसल्याने अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. अर्ज व म्हणणे पाहिले. अभिलेखाची पाहणी केली. वादी यांनी प्रस्तुतचा दावा वाटप होवुन मिळण्याकामी दाखल केला आहे. नि.क्र. १३३ नुसार दाखल कलेल्या मृत्युपत्रानुसार वादी भिमराव विठ्ठलराव मोरे यांचे दिनांक २६/१०/२०२३ रोजी निधन झाल्याचे सिद्ध होते. प्रस्तुतचा अर्ज हा मयताचे वारसांनी दिनांक १४/१२/२०२३ रोजी दाखल केला आहे. अर्ज मुदतीत दाखल केला आहे. अर्जदार यांनी शपथेवर ते मयत भिमराव विठ्ठलराव मोरे यांचे वारस असल्याचे कथन केले आहे, प्रतिवादी यांनी दर्शविलेला विरोध शपथेवरील अर्जदार यांच्या कथनाने निष्फळ होतो. त्यामुळे अर्जदार यांना वादी यांचे वारस म्हणुन अभिलेखावर येण्यास परवानगी देणे न्यायोचित ठरते आणि त्या अनुषंगाने दुरुस्ती करण्याची परवानगी देणे न्यायोचित ठरते. त्यावरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

आदेश

०१. अर्जदाराचा नि.क्र. १३१ लगतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. अर्जदार यांना दाव्यातील मयत वादी भिमराव विठ्ठलराव मोरे यांचे वारस म्हणुन अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

०३. अर्जदार यांनी दाव्यातील मयत वादी भिमराव विठ्ठलराव मोरे यांचे वारस म्हणुन अभिलेखावर घेण्याकामी योग्य ती दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करावी आणि अभिलेखावर दुरुस्त प्रत दाखल करावी.

०४. दोन्ही पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by AARISH SAIFODDIN SHAIKH
Date: 2024.07.12 11:30:54 +0530

(ए.एस.शेख)

दिनांकः ११/०७/२०२४ २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरखेड